# केका - शतक

९८५४
. ग्रं. सं. ठाणें
काव्य
१२८१

अनुक्रम ............
विभाग ............
क्रमांक ........
नों. दि. ........
वाचनालय शाखा.

★

REFBK-0008350
REFBK-0008350

—वीनोबा

## —: लोक-नागरी लीपीचा खुलासा :—

१ वर्‌ण-सुधार : ख = ख

२ बाराखडी नको : रु; रू

३ मोडी वेली : की (ह्‌रस्‌व), की (दीर्‌घ)

४ स्‌वराखडी : अ, आ, अी, अी, अु, अू, अे, अै अीत्‌यादी

५ चींद्‌र-जोडी : वेदांत (वेदान्‌त), वेदांत (वेदां मधे),

६ साघात :जोडाक्‌षरे पाय-मोड : स्‌व-राज्‌य

७ नीराघात :जोडाक्‌षरे—

(अ) 'या' कानी : तुमची (च्या)

(आ) 'ये' मात्‌रा : मोळीवीके (क्ये)

(अी) महाप्‌राण : ’म (म्ह), ’न (न्ह), ’व (व्ह)

८ दंत-तालव्‌य : :च, :ज, :झ

९ ह्‌रस्‌व 'अे' : "देहे-दुःख हे सुख मानीत :जावे"

१० शीरोरेखा छापणीत असो, लीहीणीत नसो.

# केका - शतक

★

वीनोबा

REFBK-0008350

ग्राम - सेवा - मंडळ, वरधा

[कींमत ८ आणे

१९५४]

प्रकाशक

भाऊ पानसे,

मंत्री,

ग्राम - सेवा - मंडळ, गोपुरी

नालवाडी, वर्धा

प्रती ५००

मुद्रक

राम म्हसकर

ल० न० मंदिर विभाग,

ग्राम - सेवा - मंडळ,

परंधाम, पो० पवनार (वर्धा)

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# : वीषयानुक्रम :

पान

प्रस्तावना १

**पहीलें प्रकरण** केका : १ – ९

हे सकलपावनाधारा ! तुमच्याशीवाय मला कोणी तारणारा नाही । ८

**दुसरें प्रकरण** केका : १० – २०

पुरती दया करून माझा पतीताचा उद्धार करा । १०

**तीसरें प्रकरण** केका : २१ – २८

तुम्हाला स्तुती आवडते आणी तुम्हीच तीचे अधीकारी आहा, हें मला ठाऊक आहे । १३

**चौथें प्रकरण** केका : २९ – ३४

म्हणून माझी कवीता मी तुम्हालाच अर्पण करतो । १५

**पांचवें प्रकरण** केका : ३५ – ४१

तुम्ही नीरंतर दयाळु, पण माझ्या उद्धाराशीवाय मला वीश्वास पटणार नाही । १७

**सहावें प्रकरण** केका : ४२ – ४६

तुम्ही सुखी तर आम्ही सुखी, म्हणून मला
तुमचीच आधी काळजी वाटते । १९

**सातवें प्रकरण** केका : ४७ – ५३

माझ्या चित्तातील विषय-वासनेचें निवारण
करा, म्हणजे मी तुमच्या गुण-कथेत मग्न राहीन । २०

**आठवें प्रकरण** केका : ५४ – ६२

ध्रुवाप्रमाणे मला तुमचे गुण गाण्याची शक्ती द्या । २२

**नववें प्रकरण** केका : ६३ – ७३

माझी कसोटी न पाहता तुमची नेहमीची दया दाखवा । २४

**दहावें प्रकरण** केका : ७४ – ८३

तुमच्या दयाळुपणाला उपमाच नाही । २७

**अकरावें प्रकरण** केका : ८४ – ९४

तुमच्या मोहक रूपालाही तुमच्या कथेची सर
येणार नाही । २९

**बारावें प्रकरण** केका : ९५ – १००

सत्-संगतीत ठेवून मला मार्गाला लावा,
एवढेंच माझें शेवटचें मागणें आहे । ३२

**केका-सूची** ३४

अनुक्रम ... वाचनालय शाखा

# प्रस्तावना

कॉलेजच्या दीवसांत केकावली हे अेक माझे वीर-गुळ्याचें साधन असे। अुंच्या आवाज़ात मी केकावली गात असे आणी आसपासच्या आळी त्याने दुमदुमून ज़ात असत। माझा थकवा दूर होत असे आणी अीतर कोणाला त्याची कटकट वाटत असेल अशी शंकाही माझ्या मनात येत नसे। आज़ तशी शंका मला येते। पण त्यासाठी मी अीलाज़ अेवढाच काढला आहे की अशी गोडी असणारांनी शहरांत राहूच नये। जानश्रुती राजाचा सारथी राजाच्या सांगण्या-वरून ज्ञानी माणसाच्या शोधासाठी नीघाला आणी सारें शहर हींडून ज्ञानी सापडत नाही म्हणून परत आला। राजा त्याला म्हणतो, “अरे, शहरांत का ज्ञानी सापडत असतात? ज्ञानी माणसाचा शोध जीथे करायचा असतो तीथे ज़ाअून कर।”

पुढे लोकसेवेच्या अनेकवीध कामांत आणी वेदादी अध्ययनात माझी केकावली मागे पडली पण तीचा अुम-टलेला ठसा पुसायचा नव्हताच। मराठी शीकवीण्याच्या नीमीत्ताने ती पुन्हा हाताशी आली। चार दोन श्लोक नीवडून समाधान होत नव्हतें, सबंध शीकवीण्याची वृत्ती

न'वती, गरज़ वाटत न'वती । त'वा झाडून झटकून शंभर श्लोक नीवडले । ज़ुने लीखाण झटकून घेतल्याशीवाय चालायचे नसतेच । कवीचा हेतूलाही ते धरूनच आहे । मला केकाशतकच लीहायचे होते; पण शंभराची अरदी 'मटली की पंधरा वीस वर घालायची रीत आहे तीला अनुसरून मी १२१ केका लीहील्या होत्या, त्यांतल्या अेकवीस परत करून शतक ठेवले आहे । तसे करण्यात कवीतेतील भक्तीरसाची हानी झालेली नाही अशी माझी खात्री आहे । कदाचीत् गोडी वाढली असेल ।

मोरोपंतांची कवीता माझ्यासाठी संस्कृत-प्रवेशीका झाली । शाळेत वडीलांच्या सल्ल्याने मी फ्रेंच भाषा घेतली होती । शाळेत मी काय शीकावे, काय शीकू नये या संबंधाने आअीला काही सूचवावयाचे नसे; पण मी संस्कृत भाषा घेतली नाही हे तीला रूचले नाही । ती 'मणाली, " वीन्या, संस्कृत आपल्या धरमाची भाषा । ती नको का तुला यायला ? " मी तीला 'मणालो, " त्याची तू चींता करू नकोस । ती यायला हवी असेल तर आल्याशीवाय राहील का? दरेक गोष्ट शाळेतच शीकायला पाहीजे का ? " पुढे संस्कृत भाषा मला आली । ती शीकण्यात मला काहीच सायास पडला नाही । आणी माझ्या नांवाला पंधरा-वीस भाषांचे ज्ञान ज़री चीकटले असले तरी मला हे माहीत आहे की मराठी वगळल्यास संस्कृत अीतके

दुसऱ्या कोणत्याच भाषेचें ज्ञान मला नाही । संस्कृतचा ध्वनी माझ्या कानांत भीनून गेला आहे । याचें श्रेय थोडें तरी मोरोपंताच्या कवीतेला मला द्यावें लागेल । मोरोपंताची कवीता, काव्य-संग्रहातील वीस्तर-भय-वर्जीत वीपुल टीकांच्या आधारानें, मी चांगली अभ्यासीली होती । काही मुखपाठ केली होती । त्यामुळें संस्कृतातील क्रीयापदांच्या क्लीष्ट रूपांचा त्रास न होता संस्कृत भाषा मला येऊन गेली । पुढें तीन आठवडे संस्कृत व्याकरणाला देऊन मी धर्म ग्रंथांच्या अध्ययनाला मोकळा झालो । शाळेंत संस्कृत न घेतल्यामुळें माझें काही नुकसान झालें नाही । घोकंपट्टी टळली, जी मी कधींच करू शकलो नसतो । कॉलेजांत शीकवील्या जाणाऱ्या दरबारी संस्कृत कवींच्या गचाळ साहीत्यांतून मी बचावलो । आणी 'वीक्टर ह्यूगोचें 'ले मीझराब्ल' हें अप्रतीम पुस्तक मूळ फ्रेंच भाषेंत वाचण्याची संधी मला लाभली ।

मोरोपंताची नेहमीची भाषा प्राकृत-संस्कृत-मीश्रीत आणी म्हणून सामान्य जनाला दुर्बोध अशी आहे याची जाणीव त्या कवीला आहे । तसें करण्यांत मराठी भाषेची शक्ती आपण वाढवीत आहों अशी त्याची कल्पना असेल, अथवा माझ्यासारख्यांची संस्कृत शीकण्याची सोय करण्याचा त्याचा ईरादा असेल । पण पुढेंपुढें तर संस्कृत शब्द कोणता आणी मराठी शब्द कोणता याचें भानच त्याचें

लोपून गेल्यासारखें दीसतें । लहानशा मराठी शब्दाच्या, कधी कधी तर अरबी कींवा फारशी शब्दाच्याही, गळ्यात लांबलचक संस्कृत समास अडकवीण्यात त्याला काहीच संकोच वाटत नसे । अीश्वराला आळवीणारीं भक्ती-काव्यें जेव्हा तो लीहू लागला तेव्हा मात्र संस्कृताची अैट त्याने सोडून दीलेली दीसते । तथापी लागलेली ओढ अजीबात सुटलेली नाही । 'परम अुग्र दावा' (केका १८) अशा-सारखी वीजोड रचना केकावलीतही कोठे कोठे आढळते । तथापी तुलनेने केकावलीची भाषा बरीचशी समतोल, समर्पक आणी कवीच्याही अपेक्षेबाहेर (केका २९) साजरी आहे, असें मला वाटतें । कदाचीत् परीचयाने मला ती तशी वाटत असेल ।

संस्कृत-प्राय भाषा लीहीण्याचा दक्षीणेकडील कवींत अेक संप्रदायच आहे । दक्षीणेकडील भाषा तशा संस्कृतातून नीघालेल्या नाहीत, पण तींनी अुत्तरेकडील भाषांहूनही संस्कृत अधीक पचवलें आहे । तसें करण्यात मोरोपंतांप्रमाणेच त्यांचा दुहेरी हेतु होता असें मी समजतो । शंकराचार्यांची मातृभाषा असलेल्या मलयाळम् भाषेत अशा शैलीला 'मणीप्रवाळम्' असें नांव आहे । संस्कृत मणी आणी मलयाळम् प्रवाळ, अुभयजडीत अशी अेक शैली मलयाळम् साहीत्यकारांनी मानलेली आहे । सदर शैलीत केवळ संस्कृत शब्दां-

ची बहुलता असते अेवढेच नाही, तर मधे मधे सबंध-
ची सबंध संस्कृत वाक्ये व मधे मधे मलयाळम् वाक्ये
अशी गुंफणच असते । मोरोपंतही अेखादे वेळेस अशी
गुंफण करीत असतो । केकावलीतच ‘ क्षमस्व भगवन्
अजामील-सखोऽस्मी ’ असे अेक संस्कृत वाक्य घालून
दीले आहे (केका ३७) । मणी-प्रवाळ शैलीत हे नेहमी-
चेच असते । मोरोपंत वीशेष प्रसंगीच तसे करतो ।
संस्कृतातील संस्कृती जीरवून घेणेचा दक्षीणेकडील
देशी भाषांचा मध्य-युगातला हा हेतुपुरःसर यत्न
होता । त्यातून त्या भाषा आता समर्थ झाल्या आहेत । आणी
संस्कृताचा अधीक आधार घेणेची त्यांना आता गरज
अुरलेली नाही ।

केकावलीत मोरोपंताने आपल्या हृदयाचा सर्व
जीवाळा ओतला आहे । त्याच्या दृष्टीने ती त्याची अंतीम
कृती आहे । कारण अीथे तो आपली कवीतारूप कन्या
भगवंताला समर्पण करीत आहे । त्यानंतर त्याने काही
कवीता लीहीली नसेल असे नाही । कवीच होता तो ।
रडला तरी कवीतेतच रडायचा ! हसला तरी कवीतेत
हसायचा ! पण काव्य प्रेरणा त्याची आता संपली आहे ।
अीश्वर दर्शनाची तीव्र अुत्कंठा लागली आहे । हातून
घडलेली जनसेवा अीश्वराला समर्पून तो ग्रह-
वीमुक्त नीरहंकार होअू पाहत आहे (केका २९) ।

करता नीरहंकारतेच्या भूमीकेवर आला म्हणजे तो नाहीसा होतो आणी त्याची कृती उत्तम होते । केकावलीत जी जादू उतरली आहे, ती मोरोपंताच्या मागच्या कोणत्याच कृतीत तेवढी नाही याचे कारणही हेच आहे । उत्तमातल्या उत्तम कलाकृती करतृत्व-शून्य असतात । येथे कवी मेला आहे, भक्त जन्मला आहे । नवीन जन्मात पूर्व जन्मातला बुद्धीसंयोग सहजच लाभतो । साठ साठ हजार पद्ये लीहून कमावलेला संस्कार केकावलीला आयता लाभला आहे । म्हणून एवढे केका-शतक घेऊन वाकीची मोरोपंताची कवीता मी बहुतेक वीसरलो आहे । तसे करणेत माझा तू उत्तमच आदर केला आहेस असे कवी म्हणेल याविषयी मला शंका नाही ।

केकावली मला तुलसीदासांच्या वीनय-पत्रीकेची आठवण करून देते । दोन्हीकडे कवीता समर्पणाची कल्पना समान आहे । "तरी न इतरा वरी, हरी करी इला कींकरी" हा जसा मोरोपंताने आग्रह धरीला आहे, तसेच 'वीनय-पत्रीके'त "दीनकी बापु ! आपही बांचो" असा तुलसीदासजी हट्ट धरून बसले आहेत । येथे हे साम्य संपते । वीनय-पत्रीका एका अधीकारी पुरुषाची कृती आहे । केकावली साधकाचा टाहो आहे । 'वीनय-पत्रीका' अनेक भजनांचा संग्रह आहे । केकावली एक अखंड स्तोत्र आहे । पण वीनय-पत्रीकेतील

वीवीध भजनांतही अेक सूत्र ओवलेलें आहेच । अुलट केकावलीच्या अखंड स्तोत्रातही वीचारांचे वेगवेगळे खंड आहेतच । ते खंड या केका-शतकात वीभागून दर्शवीले आहेत ।

काव्य-दृष्टीने केकावलीचें कौतुक महाराष्ट्रातील रसीकांनी पुष्कळ केलें आहे । माझ्यासाठी त्यात काही बाकी राहीलेलें नाही । माझी ही नीवड काव्य-दृष्टीची नाही । वीद्यार्थी-दशेत माझ्या भावनेच्या परीपोषाला अुपयोगी झालेली वस्तु, माझ्यासारख्या वीद्यार्थ्यांच्यासाठी, संकलीत केली आहे । माझी ही गायनाची वस्तु आहे । अर्थ समजल्याशीवाय गाण्यात गोडी येत नाही म्हणून अर्थ करून घ्यावा । पण अर्थापेक्षाही भाव थोर असतो । भावमय होअून गाण्यात वीरून जावें ।

# केका - शतक

: १ :

[हे सकलपावनाधारा ! तुमच्याशीवाय मला कोणी तारणारा नाही ।]

१ सदाश्रीत-पदा ! सदाशीव-मनो-वीनोदास्पदा !
स्व-दास-वश-मानसा ! कली-मलांतका ! काम-दा !
वदान्य-जन-सद्गुरो ! प्रशमीताऽमीताऽसन्मदा !
गदाऽरी-दर-नंदकाब्ज-धरा ! नमस्ते सदा.

२ पदाऽब्ज-रज जें तुझें, सकल-पावनाधार तें;
अघाऽचलही तारीले बहु, तुवाची राधा-रतें;
अजामीळ, अघासुर, व्रज-वधू, बकी, पींगळा,
अशा गती दीली; अुरे न तृण, भेटता अींगळा.

३ तुझ्या, बहुत शोधीले अघ-नीधी, पदाच्या रजें,
न तें अनृत, वर्णीती बुध जनीं सदाचार जें;
असें सतत अैकतें, सतत बोलतें, मीच तें
'प्रमाण न' म्हणो जरी, अुचीत माझीया नीश्चतें.

४ तसाची उरलो कसा ? पतीत मी नसे काय ? की
कृपाची सरली ? असेही न घडे जगन्-नायकी;
नसेन दीसलो कसा ? नयन सर्व-साक्षी रवी;
'वीषाद धरीला' 'मणो ? न सुरभी वीष, क्षीर वी.

५ व्रजाऽवन करावया, वसवीले नआऽग्री धरा ;
सलील तशी मंदराश्रयही नग स्व-पृष्ठी धरा ;
वराह-तनु घेउनी, उचलीली रदाऽग्रे धरा;
सु-दुर्धर तु'मा कसा पतीत हा ? न कां उद्धरा ?

६ नताऽवन-धृत-व्रत ! ज्वलन तूची बाधा-वनी ;
पद-प्रणत-संकटी प्रजव तूची, बा ! धावनी ;
दया प्रकट दाखवी कवण, सांग, त्या वारणी ?
सती-व्यसन-वारणी, जय-जयाऽर्थ त्या वा रणी ?

७ 'अगा ! प्रणत-वत्सला !' 'मणती, त्या जना पावला,
'मणोन, तुमचेच, मी स्मरतसे सदा, पावला.
'करू बरी कृपा, हरू व्यसन, दीन हा तापला,'
असे मनीं धरा ; धरा भरंवसा मला आपला.

८ मला नीरखीता, भवच्-चरण-कन्यका आपगा
’मणे, ‘अगअी! अैकीलेंही न कधी असें पाप’ गा!
कर श्रवणीं ठेवीते, नुघडी नेत्र, घे भीतीला;
न घालीन भीडेसी मी, ज़रीही कार्य-लोभी, तीला.

९ सदैव नमीता, ज़री पद ललाट केलें कीणें,
नसे अीतर तारीता मज़ भवत्-पदाऽब्जावीणे;
नतां करुनी मुक्तही, ’मणसी ‘मी बुडालो रीणें,’
अशा तुज़ न ज़ो भज़े मनुज, धीक् तयाचें जीणें!

: २ :

[ पुरती दया करून माझा पतीताचा अुद्धार करा । ]

१० “पटुत्व सकलेंद्रीयीं, मनुजता, सुवंशीं जनी,
द्वीजत्वही दीलें भलें, बहु अलभ्य जें की जनीं;
यशः-श्रवण-कीर्तनीं रुची दीली; तरी हा ‘वरा’
’मणे ‘अधीक देच कीं;’ अशील याचकी हावरा.”

११ असें न ’मणशील तू, वरद-वत्सल! श्री-करा!
परंतु मज़ भासलें, ’मणुनी ज़ोडीतो मी करा;
दीलें बहु बरें असें, परी गमे कृपा व्यंग ती,
अलंकृती-मती सती मनीं झुरे, न ज़ों संगती.

अनुक्रम
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

१२ कराल पुरती दया, तरी असो, दीलें पावलें
परंतु हरी! अेकदा त्वरीत दाखवा पावलें;
प्रसाद करणें मनीं ज़री नसेल, हें आवरा;
ज़या बहु, तयास दी; मज़ कशास? मी हावरा!

१३ ‘दीलें, फीरुनी घेतलें,’ अशी अकीर्ती लोकीं न हो;
सुनीर्मल तुझीं पदें कधी तरी वीलोकीन हो.
नीज-प्रीय-जनांकडे तरीही दे हवाला; ज़शी
पडेल समज़ावीशी, तशी करोत; कां लाज़शी?

१४ अहा! नीपट धृष्ट मी; प्रभु-वरासी ‘कां लाज़शी?’—
’मणे; तुज़ नसो तशी वीकृती, भावीकांला ज़शी;
परंतु अपराध हा गुरु; ’मणोनी शीक्षा करी;
असेची धरीली नय-च्युत-दमाऽर्थ दीक्षा करीं.

१५ सदैव अपराध हे रचीतसे असे कोटी गा!
स्वयेंही कथीतो, नसे तीळही लाज़, मी कोटीगा;
अजांड-शत-कोटी जी अुदरीं सर्वदा नांदवा,
न तीत अवकाश या? स्थळ दीलें तदा कां दवा?

१६ तुझें, जीरवीलें बहु प्रणत-मंतु, पोटें; पण
त्यजी मदपराध; हें मज़कडेची खोटेपण;
दवाऽग्नी जठरीं अती-क्षुधीत, तोंस हें अन्न दे;
वी-तृष्ण करीती श्रीतां तुमचीया दया-सन्नदे.

१७ दयाऽब्द! वळशील तू, तरी न चातका सेवका
उणें कीमपी; भावीका उबगशील तू देव कां?
अनन्य-गतीका जना, नीरखीताची, सोपद्रवा,
तुझेंची, करुणाऽर्णवा! मन धरी उमोप द्रवा.

१८ कळे करी सुनीर्मळें परम उग्र दावा नळें;
तयात अवीशुद्ध मी, शलभ जेंवी दावाऽनळें;
व्रणार्त-पशुचे शीरावरी वनें उभे काकसे
स्मरादी रीपु मन्मनें; अहो न काळ भेका कसे?

१९ तरेन तुमचे बळें भव-महा-नदी, नावीका!
तुम्हीच मग आतरास्तव मला सुदीना वीका.
असे वीदीत वासही मज़ सदाश्रमींचा; करा
दया, गुण पहा; सवे मज़ सदा श्रमीं चाकरा.

२० धना, परीजना, घरीं तुमचीया अुणें कायसें ?
न लाभ मणी-हेम-भूपतीस ज़ोडीला आयसें;
परी प्रभुही संग्रहीं सकल वस्तुला ठेवीतीं;
गुणा न म्हणता 'अुणा-अधीक,' आदरें सेवीतीं.

: ३ :

[ तुम्हाला स्तुती आवडते आणी तुम्हीच तीचे अधीकारी आहा, हें मला ठाअूक आहे । ]

२१ 'प्रभु-स्तुती न ठाअुकी, परी तीच महा-कामुका
मला, कृपण मारीतो बहु, सकाम हाका मुका'
म्हणा मनीं असें; कसें प्रथम नीट ये लेकरा ?
हळूहळू पटु, स्वयें सुपथीं लावीयेले, करा.

२२ जनीं तरी असें असे, शीशुही जे मुखें वर्ण वी,
पीता पीअुनी ते भुले, मधुरता सुखें वर्णवी;
मना ज़री नये, गुरूक्तही म्हणे 'कटु,' प्रायशा;
दया-नीधी! तुम्हापुढे जन-कथा अशा कायशा ?

२३ 'अतर्क्य महीमा तुझा, गुणही फार, बा! हे,' वीधी
श्रुतीज्ञही म्हणे सदा, स्तवील आमुची केवी धी ?
तरी जन यथा-मती स्तवुनी ज़ाहले सन्मती;
स्तवार्थ तुझीया, तुझ्यसम कवी कधी जन्मती ?

२४ नीज-स्तुती तुम्ही रचे; स्तवीती, ते वरें तर्पीता,
नमस्कृतीपरा बरें स्वधन सर्वही अर्पीता;
स्वभाव तुमचा असा, वीदीत ज़ाहला याचकां;
करूं स्तव ज़सा तसा; फळ न ये जना याच कां?

२५ तुम्ही परम चांगले, बहु-समर्थ दाते; असे
सुदीन जन मी, तुम्हा शरण आजी आलो असे;
पुन्हाही कथीतो, बरें श्रवण हें करा यास्तव;
समक्ष कीती आपला सकल-लोक-राया! स्तव?

२६ कीती श्रवण झाकीती प्रभुही, काय ते पोळती?
पुसाल ज़री, 'कोण ते?' पद-रजीं तुझ्या लोळती;
बरें तुज़ची सोसवे स्तवन; कृत्ती-वासा गरा
न पी, तरी कसें घडे? हीत-करा! दया-सागरा!

२७ गमो मधुर, हें वीष-स्तवन, सेवीता माज़वी,
करी मलीन सद्यशोम्बुज, हलाहला लाज़वी;
हरापरीस तू बरा, प्रभु-वरा! सदा ज़ो पीशी;
असा रस समर्पीतो अमृत आपुलें ओपीशी.

२८ कवीश्वर-मनः-पयोनीधी-सुता-सुतीचे पते !
भले न वरीती सुतीप्रती, न ज़ोडीती पाप ते;
गळा पडती जेचीया तव-गुणैकदेश-भ्रमें,
तीहीं तुज़ची दावीता, भज़ती, बा ! तुला संभ्रमें.

: ४ :

[ ’मणून माझी कवीता मी तु’मालाच अर्पण करतो । ]

२९ ’मणोनी कवीता-सुता तुज़ समर्पीतो; साज़री
नसे बहुतशी गुणी, कनक-पीत-वासा ! ज़री
तरी न अीतरा वरी, हरी ! करी अीला कींकरी,
मयूर ही नीजात्मजा-ग्रह-वीमुक्त, ज़ैसा करी.

३० स्मरोनी कृत-मंतुला, न कवीता-वधू-स्वीकृती
कराल, तरी आयका प्रभु ! असाच मी दुष्-कृती;
नमस्कृती-पुरःसर स्वकृती अर्पीतो आजी, ती
दीली रवी-सुतें तु’मा ज़शी नमोनी सत्राजीती.

३१ ‘पीता भल, परंतु ती गुणवती सती चांगली,
’मणोनी मज़ आपुली भजनीं लावणें लागली;’
’मणाल, तरी तत्-सुता कशी ? तु’मासवें भांडगा
अहर्नीशी ही भांडला त्री-नव-रात्र ज़ो दांडगा.

३२ भले स्मरण ज़ाहले समयीं, कंस-दासी करे
कशी अुज़रली समुज्ज्वल-दया-सुधा-सीकरे ?
तुम्हा स्व-रीपुची तशी बटीक आवडे, मत्-कृती
नको, न सज़वे, असा बहुत काय मी दुष्कृती ?

३३ ज़शी पृथुक-तंदुल-प्रसृती आप्त-कामा, तशी
रुची कृती; सभाग्य तू, सुनय, आप्त, कां मातशी ?
‘कण्या वीदुर-मंदीरीं,’ ’मणती साधु ‘आस्वादील्या;’
खरे ज़री, कशा तुज़ प्रभुसी, आपुल्या स्वा, दील्या ?

३४ जीर्णे, रस पहावया, प्र-शीथीलीं रदीं चावीलीं,
सुवास ही कळावया, प्रथम नासीकीं लावीलीं,
तुम्हासी शबरी तशी बदरीका-फळे दे ज़ुनीं,
कथा अशी असो, पहा स्व-चरीते तुम्ही मुज़ुनी.

: ५ :

[ तुम्ही नीरंतर दयाळु, पण माझ्या अुद्धाराशीवाय मला वीश्वास पटणार नाही । ]

३५ प्रभो! शरण आलीयावरी न व्हा कधी वाकडे,
म्हणोनी अीतुकेंची हें स्व-हीत-कृत्य जीवाकडे.
प्रसाद करीता, नसो पळ वीलंब बापा! खरें;
घनांबु न पडे मुखीं, अुघडील्या वीना पाखरें.

३६ शीवे न तुझीया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो! चुकतसो तरी करीसी तूंची संरक्षण;
नसेची शरणागती घडली सत्य अद्यापी ती;
रुचे वीषय, ज्या मीळे अमृत, ते न मद्या पीती.

३७ वीपाक न गणोनी, म्या प्रकट आपल्या घातकें
कळोनी, अमीतें बळें वीवीध जोडीलीं पातकें;
'क्षमस्व भगवन्! अजामील-सखोऽस्मी,' असें तुला
म्हणे नमुनीया, सु-दुस्तर-वीपन्नदी-सेतुला.

३८ नवे अनंत, सत्य तें; अचल अूचलीला करें
तुवा हरी-मदाऽपहें, बृहदुदार-लीलाकरें;
समुद्धरसी अेकटा ज़री जडासी या कर्दमीं,
'मणेन भुवन-त्रयीं तरी तुला ' भला मर्द ' मी.

३९ चीकीत्सक ' भला भला ' 'मणुनी फार वाखाणीला,
ज़री बहु-जनामय-द्रुम समूळही खाणीला,
तथापी अती-दुःसह-स्वगद-शत्रुचा अत्यया-
वीना न हृदयीं धरी सरुज पामर प्रत्यया.

४० 'मणा मज़ अुतावीळा; गुणची घेतला; घाबरें
असो मन असेंची बा ! भजक-बर्ही-मेघा ! बरें;
दीसे क्षणीक सर्व हें, भरवसा घडीचा कसें
धरील मन? आधीनें बहु परीभ्रमे चाकसें.

४१ कृतांत-कटकाऽमल-ध्वज-जरा दीसो लागली;
पुरःसर-गदांसवें झगडता तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुज़वीण बळें आगळा;
न हो ज़री अुतावीळा, स्व-रीपु कापीतो हा गळा.

: ६ :

[ तुम्ही सुखी तर आम्ही सुखी, म्हणून मला तुमचीच आधी काळजी वाटते । ]

४२ अवश्य करणे असे, प्रणत-रक्षण स्वोचीत;
उशीर मग कां? बसो कृपण मीही कां शोचीत?
नव्हे प्रभु-वरा! तुम्हा उचीत अेकटे धावणे:
कृतांत शीवला नसे तंव दीसे बरें पावणे.

४३ 'कसे तरी करू तुझें अवन; पूरवू आळ, जी
असेल मनीं; आमुची तुज कशास रे! काळजी?'
असें ज़री म्हणाल, हो! प्रीयतमा! जगज्जीवना!
तदाश्रीत-मृगासी ती सुख-समृद्धी, बा! जी वना.

४४ सुखेंची सुख बाळका प्रकट होय मातेचीया;
तीला घडती जे श्रम, प्रीय-जनोत्तमा! तेची या;
म्हणोनी न शीवो पळ क्षणही कष्ट जीवा! तुला,
वीपज्-जलधी-सेतुला, सकल-लोक-जीवातुला.

४५ असोत तुज आमुचीं सकल भावीकायुर्-बळें;
ज़गोनी बहु, काय मी सुकृत ज़ोडीलें दुर्बळें?
असें प्रीय-सखे! सुखी बहुतकाळ; माया-तमीं
जना सुपथ दाखवीं; मुदीत, सत्तमा! यात मी!

४६ 'भले परीशीले सुराऽसुर-नरीं तसें लक्ष मी'
'मणोत 'मणणार, बा! तुज़ असा नसेल क्षमी;
अुरीं भृगु-पदाहती मीरवीतोसी अद्यापी ती,
कवी तव यशः-कथा नव-सुधाऽनवद्या पीती.

: ७ :

[माझ्या चीत्तातील वीषय-वासनेंचें नीवारण करा, 'मणजे मी तुमच्या गुण-कथेंत मग्न राहीन । ]

४७ 'भवन्-मतीस आवडे ज़री, धनादीकालागी ते,
मदीय गुण-कीर्तन-श्रवण कां तरी त्यागीते?'
असेंही 'मणशील बा! ज़री, तरी तुझी मावली
तुज़ त्यजुनी, पाजीता, कशी दुधाकडे धावली?

४८ अनावर पीशाचीका वीषय-वासना सत्य, जी
असें करवी कृत्य, जी भुलवीते, कधी न त्यजी;
'मणोनी तुज़ ज़ाणत्या वीनवीतो, 'अीला काढ गा!'
करीन मग, तू ज़री 'मणसी, आपणा 'गाढ गा.'

४९ तुझ्या गुण-कथा महा-सुरभी; त्यांत ही रासभी
शीरे वीषय-वासना; ज़शी शुका अहीरास भी,
तशी न अीतरास भी; अीस सदंडही हाकीती,
तथापी बहु लाथळी; मग अदंड मी हा कीती?

५० खरासुर जसा, तशी वीषय-वासना हे खरी;
हीचा वध करावया, तुझची शक्ती आहे खरी;
वकी सुमती, ताटका लघु, न हे भली; लाजशी
अुगाची; तशी अेक ही, व्रज-वनात लीला जशी.

५१ कसें तरी असो मग; स्व-पण-रक्षणाकारणे
अवश्य शरणागत-व्यसन तो स्वयें वारणें;
तुम्हा वीहीत मुख्य हें; न पुसता करा, हो खरी
नीजोक्ती; खर काय तो अधीक? संहरा हो खरी.

५२ खरी करीतसे कशी तव जनींही सत्ता, पहा;
हीचा वध न नींद्य, बा! प्रबळ मूर्त सत्ताप हा;
'कथा-सुरभीचा रस स्व-हीत, पुष्कळ, स्वादुही,'
'मणे,' 'त्यजुनी कां मला नीज-धना, परस्वा, दुही?'

५३ कथा-सुरभी या भलत स्व-जननींहुनी वाटती;
शीशूंसी जरठांसही नीरखीता रसें दाटती;
दुहोत भलते सदा तरी न लेशही आटती;
स्व-वत्स-मल भक्षीती, परी न सर्वथा बाटती.

: ८ :

[ ध्रुवाप्रमाणें मला तुमचे गुण गाणयाची शक्ती द्या । ]

५४ कथांसी उपमा दीली सुरभीची, दीसे नीट ती;
परंतु बहु-मंद मी, 'मणुनी सच्-छ्रुती वीटती;
कथा नीरुपमा, तयाप्रती पशूपमा, शुद्ध तें
नवेंची; न वीचारीलें बुध-जनांसी मी उद्धतें.

५५ असेंही उपदेशीती गुरु रहस्य मंदा, 'रुचे
नीज-स्तव जसा तसा, अगुण घे न वंदारुचे;'
'मणोनी नीगम-स्तुता! भलतसें तुला वानीतो,
परंतु हृदयीं महाजन-भयास मी मानीतो.

५६ 'मणे-'स्व-कृतीचा, अणु कीमपी, एक वर्णीं, न हो;
असें तुज़ कधी बरें वीगत-शंक वर्णीन हो!'—
असेची अशी आवडी, करीसी कां न अत्यादर?
स्व-भक्त-सुर-पादपा! हरी! नसेची सत्य दर.

५७ ध्रुव स्तवनीं आवडी धरी, 'मणोनी अत्यादरें
तु'मी करुनी दावीली, शीवुनी गल्ल, सत्या, दरें;
तसें मज़ करा, करांबुज धरा शीरीं, मा-वरा!
वराऽभयपरा! पराक्रमपटो! मना आवरा.

५८ करांबुज असो; नसे अुचीत तम्स मी पामर;
प्‌रणाम करीती पदाप्‌रतीही सन्‌मुनी साऽमर;
पदाऽब्‌ज-रजही जगत्‌-त्‌रय-नमस्‌क्‌रीया-भाजन;
प्‌रसाद-चतुरा! कसा तरी करा बरा हा जन.

५९ तुम्ही करुनी दावीला ध्‌रुव कृतार्‌थ ज़ेंसा दरें,
तसेंची ज़री योजीलें तुमचीया मनें सादरें,
असो; वीहीत तें करा; परी बरोबरी तम्सवें
नसे अुचीत; तो महा-प्‌रबळ, वंदीजे वासवें.

६० कीती वय! कसें तप प्‌रखर! काय वीश्‌वास तो!
ध्‌रुव ध्‌रुव खरा; स्‌तवा अुचीत होय वीश्‌वास तो;
कशी तुळीतसा तुम्ही प्‌रकट मेरुशी मोहरी?
प्‌रसाद करीता अुणें अधीक नाठवा, हो! हरी!

६१ प्‌रभुत्‌व तरी हेंच की, करुनी दे कृपा दान तें,
स्‌व-साम्‌य यदुपार्‌जनें मीरवीजे स्‌व-पादानते?
प्‌रसाद मग काय तो, ज़री नीवारीना लाघवा?
कसें दश-मुखाऽनुजा वीसरला? अहो! राघवा!

६२ असो वरी कसा तरी, वीमल भाव ज्याचा, करा
तयावरी दया; पचे वर असाची दे चाकरा;
वृथाची गमतें दीलें, बहुही; जें न दासा जीरे;
पुसोनी अधीकार दे; सुकर तें सदा साजीरें.

: ९ :

[ माझी कसोटी न पाहता तुमची नेह ... ... दया दाखवा । ]

६३ तुझें कुशल नाम बा! हळुहळू मना आकळी,
दुरत्यय असा महा-अळही तम्स भी हा कळी;
हरी व्यसन पाप हे; बहु कशास? कायाधवा –
परी त्वरीत भेटवी तुजही, योगमाया-धवा!

६४ तुमासमची हे गुणें; अणु अणुं नसे नाम; हा
दीसे अधीकही तसा गुण, तुला असेना महा;
सदैव भलतम्सही सुलभ; आणखी गायका
छळी न, न अधोगती क्षणही दे, जगन्-नायका!

६५ छळीं, नृप बळी बळी, तरीच तो नसे आटला,
गमे बहु भला, मला न, सकळांसही वाटला;
परीक्षक करी तसें जडही सोशीतें हेमही;
न केवळ वीरोचनात्मज, तरे पदें हे मही.

६६ नको छळ; अधीर मी; तशी न कीर्ती हो; चामरें
नृपासी उचीतें; वृथा, मीरवीलीं जरी पामरें;
अकीर्तीच असो, रुचे तुज कशी व्रजीं कांबळी!
असें न समजा कसें? वरील हारीला कां बळी?

६७ छळाल कृपणासी कां? अजी दया-नीधे! कापीती
भटासी भट संगरीं, परी न कातरा दापीती;
कराल तीतुकी कृपा बहु; अहो! शरण्या! तमीं
बुडोनी, शरणागत श्रमतसे अरण्यात मी.

६८ मुखासी जंव पातलीं 'श्रम', 'अरण्य' ऐशीं पदें,
नीज-स्मृतीस जाहलीं वीषय ती तव श्री-पदें,
गुरुकृतीस करावया सफल, जानकी-जीवना!
धरा-सुर-तपः-फळें त्वरीत धावलीं जी वना.

६९ तयी प्रभु-वरा! तसे सदय; कां असे आज हो?
वीचारुनी पहा बरें नीज-मनीं, महाराज हो!
वनोवनीं फीरा पीशापरी, म्हणा अहोरात्र 'हा!'
नसे कुशल भाषणीं, परी असे कृपा-पात्र हा.

७० समागम तुझा घडो, म्हणुन ज़ाहले लाकडें
तपोऽनलीं तसे मुनी त्यजुनी, ज़ोडीलें माकडें,
अयुक्त बहु जें जनास्तव घडे, पडे साकडें,
तदुक्तीहुनी आमुचें बहुत बोलणें वाकडें ?

७१ न जें प्रीय, सदोष तें; प्रीय सदोषही चांगलें;
स्व-तोक पीतरां रुचे, ज़रीही कर्दमीं रांगलें;
तुलाची धरी पोटीशीं कशी तदा यशोदा बरें ?
ज़री मळवीशी रजोमलीन-काय तू अंबरें.

७२ तुझे कथीती गोपीका वीवीध तैस बोभाट, ते
सुख-प्रद गुण-स्तवापरीस ज़ाहले वाटते;
क्षमा न करी अेकदा, तरीही फार थोडी करा;
न देची भय, ताडनोद्यमसमेत सोडी करां.

७३ तुम्हीही बळी बांधीला, म्हणुनी आमुची माय जी
मनात सहजा दया, नीपट टाकीली काय जी ?
सकोप दीसती गुरू क्षणभरीच; जें तापलें
जल ज्वलन-संगमें, त्यजी न शैत्य तें आपलें.

: १० :

[ तुमच्या दयाळुपणाला उपमाच नाही । ]

७४ प्रसीद्‌ध तुमचे महा-सदय पाय; जीवाकडे
चुकी, म्हणुनी होतील क्षणही काय जी वाकडे ?
न नीष्ठुर पीता; म्हणे मनीं, 'न हो प्रजा टोणपी;'
अपथ्य-रुची-रुग्ण तो कटुक औषधें कोण पी ?

७५ असंख्य खळ संगरीं नीज-करीं तुवा मारिले;
न नीष्ठुरपणें, कृपा करुनी ते भवीं तारिले;
जगज्-जनक तू, मुलें सकळ जीव, या भातुकें;
दटावुनीही देशी वा; अमृत नेदीजे घातुकें.

७६ सदाही हीत नायको; बहु अपाय केले, करू;
तरी सकृप बाप तू म्हणसी 'नायके लेंकरू;'
कधी न करीसी प्रभो, भजक-बाळकोपेक्षण;
न तूज़वरी ज्यापरी पशुप-पाळ कोपे क्षण.

७७ खरा जनक तू, जनां ईतर कोण हो देववी ?
समीहीत फळें जगा तव पदाऽब्ज दे, देववी;
अशीच करुणा असो, हरी! कधी न भंगो पीता;
अशा मज़ असाधुला ईतर कोण संगोपीता ?

७८ सुवीद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी
प्रपंच, भर घे शीरीं, करी कृपा पीता त्यावरी;
असा ज़री नसे, रुचे तरी न तो अभद्र क्षण;
तसा तुज़ची आवडे; करीसी तूची तद्-रक्षण.

७९ पीता ज़री वीटे, वीटो; न जननी कुपुत्रीं वीटे;
दयाऽमृत-रसार्द्र-धी न कुल-कज्जलें ती कीटे;
प्रसाद-पट झाकीती, परी परा गुरूचे थीटे;
'मणूनी 'मणती भले 'न अृण जन्मदेचें फीटे.'

८० वीटेल जननीही कीं शत रची नीमीत्तें वीधी;
मळे कली-युगीं श्रुती ज़शी, अळीं तीची तेवी धी
कदाचीत वीटेल, बा! तव दया न दीनावरी;
ज़शी जगदघ-क्षयीं कर भवन्-नदी नावरी.

८१ कृपाची जननी तुझी, सकल जीव दायाद; या
तीणेची अुपदेशीलें करीती सर्व दाया दया;
असें अुमज़ता भले न गुरु-भाव तो टाकीती;
मता तुज़ही गोपीका, मग जनास तोटा कीती?

८२ भरोनी कुच-कुंभ, जी वीष-रसें मुखीं दे बकी,
प्रभो! तीसही ठेवीशी, ज़शी महा-सुखीं देवकी;
न होती जननी कशा पशुप-दार, गाई? लया
न पावतीच तत्-सुखें, कृती न कोण गाईल या?

८३ अशी तरी कृतज्ञता हरी! तुझ्याची ठायी अगा!
सख्या! अणुची मानीशी, करुनी सुप्रसादा अगा!
भुले सुकवी-वाग्-वधू तव गुणा अनर्घ्या नगा;
'मणेल जन कोण, की यश पुनःपु'ना तें न गा?

: ११ :

[तुमच्या मोहक रूपालाही तुमच्या कथेची सर येणार नाही।]

८४ तु'मी बहु भले, मला अुमज़ होय ऐसें कथा;
कसा रसीक तो? 'पु'ना' ज़री 'मणेल 'आली कथा;'
प्रती-क्षण नवीच दे रुची, शुकाही संन्यासीया;
न मोहीती भवत्-कथा अरसीका अधन्यासी या.

८५ कथा भुवन-मोहीनी अशी न मोहीनी होय ती;
हरी असुर-धी; हीणे भुलवीले कीती हो! यती,
न'वे न 'मणवे; असो; ज़री वीमोहीला दक्षहा,
प्रीया बसवीली शीरीं, मुनी-पथीं कसा दक्ष हा?

८६ सुराऽसुर-नरोरगा भुलवुनी कथा न त्यजी;
न भेद करी पंक्तीचा, अमृत पाजीती सत्य जी;
तीणे ज़री सुधा-रस स्व-रत-मानसा पाजीला,
वधी अमृत घोटीता, दुख न येची बापा! जीला.

८७ 'मणोनी बहु मोहीनीहुनी भली कथा हे तुजी,
अभीष्ट फल दयावया नत-मनोरथा हेतु जी;
'मणाल ज़री, 'मीच्च तव, वीषम काय दोघींत! रे?
ज़सा जन सीताऽसीताऽभीध-नदी-सदोघी तरे'.

८८ अहा! बहु वीशुद्ध हे प्रभु! तव स्वरूपाहुनी;
न भीन्न-तनु तव; भले भजती, एकता पाहुनी;
परंतु वदतो जनाऽनुभव, नातळो पाप गा?
तशी न यमुना गमे, ज़शी गमे नीलींपापगा.

८९ जगद्-गुरु-महेश्वर-प्रभु-शीरीं जीचें नांदणें,
जीचा जळ-मळें तुळे न शरदींदुचें चांदणें,
प्रजा हरी-हरा अशा यदुदरीं अनेका; कवी —
भीऊनी 'मणतील का, 'ज़शी सुधा तशी काकवी'?

अनुक्रम 9604 ... 920 ... 977 वाचनालय

९० 'त,ला स्व-यम,नसवे, क,वलय-द्य,ती श्यामला !'
मणाल ज़री 'मोहीनी नीज-तन,' अवश्य मेला,
त,लीन अम,तोदधी-प्रभव-प,डरीका मला
कथा स,र-ध,नीसवे, स,जन जीत वीश्राम क्।

९१ प्रभो ! त,ज़ न मोहीनी भ,लवी, मोहीला तोही ती
त्यजी जन; न वे तशी, त,ज़ त,झी कथा मोहीती;
नीजाऽन,भव तू पहा; ज़शी महौषधी पारदा,
त,ला स्थीर बळे करी, कळवीले त,वा नारदा.

९२ स,रर्षीज़वळी स्वये वदसी, 'तत्र तीष्ठामी;' या –
त,झ्मची वचने मणे त,ज़ 'कथा-वश' स्वामीया !
ज़सा स्थीर कथेत तू, स्थीर करी तसे या मना;
स्व-भक्त-स,र-पादपा ! सफळ हे असो कामना.

९३ स,रर्षी मणतो, 'त,झे यशची धन्य; यो गायना
मला; कवी मणोत ते स,भद अन्य-योगाऽयना;'
वीम,क्ती-बह,-साधने तदीतरे गणीनाच़ तो;
सज़्नी वर-वल्लकी तव सभांगणी नाच़तो.

९४ तुझें चरीत सन्-मुखें श्रवण ज़ाहलें, यास्तव
प्रजापती-सुतत्व ये, करीती साधु जम्चा स्तव;
स्वनीचपण मागीलें, बहु दया अशी, नारदा
स्मरे घडीघडी, प्रभो! भव-पयोधीचा पारदा!

:१२:

[ सत्-संगतीत ठेवून मला मार्गाला लावा, अेवढेंच माझें शेवटचें मागणें आहे । ]

९५ तुझें यशची तारीतें, परी न केवळा तारवे;
सहाय असीला असे, तरीच शत्रुला मारवे;
न भागवत भेटता, न घडताही सत्-संगती,
न अज्ञ-हृदयें तशीं तव यशो-रसीं रंगती.

९६ बुडे, बुडवी सागरीं तरी, सुकर्ण-धारावीना;
सहाय नसता स्वयें पर-तटासी ती दावीना;
सहाय भगवज्-जना तव सुकीर्ती जेंवा करी,
तशीच अुतरी भवोदधी-तटीं जना लौकरी.

९७ सुसंगती सदा घडो; सुजन-वाक्य कानीं पडो,
कलंक मतीचा झडो; वीषय सर्वथा नावडो;
सदंघ्री-कमळीं दडो; मुरडीता हटाने अडो;
वीयोग घडता रडो मन, भवच्-चरीत्रीं ज़डो.

९८ न नीश्‌चय कधी ढळो; कुजन-वीघ्‌न-बाधा टळो;
न चीत्‌त भजनीं चळो; मती सदुक्‌त-मार्‌गीं वळो;
स्‌व-तत्‌व हृदया कळो; दुरभीमान सारा गळो;
पुन्हा न मन हे मळो; दुरीत आत्‌म-बोधें जळो.

९९ मुखीं हरी! वसो तुझी कुशल-धाम-नामावली,
क्‌षणात पुरवील जी सकल कामना, मावली;
कृपा करीशी तू जगत्‌-त्‌रय-नीवास! दासावरी,
तशी प्‌रकट हे नीजाश्‌रीत-जना सदा सावरी.

१०० दयाऽमृत-घना! अहो हरी! वळा मयूराकडे;
रडे शीशु, तयासी घे कळवळोनी माता कडे;
असा अतीथी धार्‌मीक-स्‌तुत-पदा! कदा सापडे?
तुम्हा जड भवाऽर्‌णवीं अुतरीता न दासां पडे.

# केका-सूची

## अंक केकांचे आहेत।


| | | | |
|---|---|---|---|
| अगा! प्रणत-वत्सला! | ७ | करील पुरती दया, | १२ |
| अतर्क्य महीमा | २३ | कवीश्वर-मनः- | २८ |
| अनावर पीशाचीका | ४८ | कसे तरी असो | ५१ |
| अवश्य करणे खरें, | ४२ | कसें तरी करू | ४३ |
| अशी तरी कृतज्ञता | ८३ | कळी करी सुनीर्मळीं | १८ |
| असंख्य खळ संगरीं | ७५ | कीती वय! कसें तप | ६० |
| असें न म्हणशील | ११ | कीती श्रवण झाकीती | २६ |
| असेंही उपदेशीती | ५५ | कृतांत-कटकाऽमल- | ४१ |
| असोत तुज आमुचीं | ४५ | कृपाची जननी तुझी, | ८१ |
| असो वरी कसा तरी, | ६२ | खरा जनक तू, | ७७ |
| अहा! नीपट धृष्ट मी; | १४ | खरासुर जसा, | ५० |
| अहा! बहु वीशुद्ध | ८८ | खरी करीतसे कशी | ५२ |
| कथा भुवन-मोहीनी | ८५ | गमो मधुर, हे वीष- | २७ |
| कथांसी उपमा दीली | ५४ | चीकीत्सक 'भला भला' | ३९ |
| कथा-सुरभी या भल्या | ५३ | छळाल कृपणासी कां? | ६७ |
| करांबुज असो; नसे | ५८ | छळीं, नृप बळी बळी, | ६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| जगद्-गुरु-महेश्वर- | ८९ | दीलें, फीरुनी घेतलें, | १३ |
| जनीं तरी असे असो, | २२ | धना, परीजना, घरीं | २० |
| जशी पृथुक-तंदुल- | ३३ | ध्रुव स्तवनीं आवडी | ५७ |
| जीणें, रस पहावया, | ३४ | नको छळ; अधीर मी; | ६६ |
| तयीं प्रभु-वरा! तसें | ६९ | न जे प्रीय, सदोष | ७१ |
| तरेन तुमचेच बळें | १९ | नताऽवन-धृत-व्रत! | ६ |
| तसाची अुरली कसा ? | ४ | न नीश्चय कधी ढळो; | ९८ |
| तुझ्या गुण-कथा | ४९ | नवे अनृत, सत्य ते; | ३८ |
| तुझ्या, जीरवीलो बहु | १६ | नीज-स्तुती तुम्हा रुचे; | २४ |
| तुझ्या, बहुत शोधीलो | ३ | पटुत्व सकलेंद्रीयीं, | १० |
| तुझे कथीती गोपीका | ७२ | पदाऽब्ज रज जे तुझें, | २ |
| तुझें कुशल नाम बा! | ६३ | पीता अळ, परंतु ती | ३१ |
| तुझें चरीत सन्-मुखें | ९४ | पीता ज़री वीटे, | ७९ |
| तुझें यशची तारीतें, | ९५ | प्रभुत्व तरी हेंच की, | ६१ |
| तुमासमची हे गुणे; | ६४ | प्रभु-स्तुती न ठाअुकी, | २१ |
| तुम्हीं करुनी दावीला | ५९ | प्रभो! तुज न मोहीनी | ९१ |
| तुम्हीं परम चांगलो, | २५ | प्रभो! शरण आलीयावरी | ३५ |
| तुम्हीं बहु भलो, | ८४ | प्रसीद्ध तुमचे महा- | ७४ |
| तुम्हींही बळी बांधीला, | ७३ | बुडे, बुडवी सागरीं | ९६ |
| तुला स्व-यमुनेसवें, | ९० | भरोनी कुच-कुंभ, | ८२ |
| दयाऽब्द! वळशील तू, | १७ | भले परीशीले सुराऽसुर- | ४६ |
| दयाऽमृत-घना! अहो | १०० | भले स्मरण ज़ाहले | ३२ |

| | | | |
|---|---|---|---|
| भवन् -मतीस आवडे | ४७ | सदाश्रीत-पदा ! | १ |
| मला नीरखीता, भवच्चरण | ८ | सदाही हीत नायको; | ७६ |
| मुखासी ज़ंव पातलीं | ६८ | सदैव अपराध हे | १५ |
| मुखीं हरी ! वसो तुझी | ९९ | सदैव नमीता, ज़री | ९ |
| 'मणा मज़ उतावीळा; | ४० | समागम तुझा घडो, | ७० |
| 'मणे—स्वकृतीच मी, उणे | ५६ | सुखेंची सुख बाळका | ४४ |
| 'मणोनी कवीता-सुता | २९ | सुरर्षीज़वळीं स्वयें | ९२ |
| 'मणोनी बहु मोहीनीहुनी | ८७ | सुरर्षी 'मणतो, तुझे | ९३ |
| वीटेल जननीही की | ८० | सुराऽसुर-नरोरगा | ८६ |
| वीपाक न गणोनी, मी | ३७ | सुवीद्य, धन मेळवी, | ७८ |
| व्रजाऽवन करावया | ५ | सुसंगती सदा घडो; | ९७ |
| शीवे न तुझीया पदा | ३६ | स्मरोनी कृत-मंतुला, | ३० |


REFBK-0008350
REFBK-0008350
संग्रहालय
अनुक्रम ९.६६९०
क्रमांक ९२८९
नों. दि. ९/७/१५
३९०